# जागतिकीकरणाचा भारतीय कृषी रोजगारावर होणारा परिणाम

**प्रा. डॉ. विलास तुळशीराम ठाकूर**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
श्री शिवाजी कॉलेज, कंधार-४३१७१४
Vilasthakur13@gmail.com
मोबाईल नं. ९४२१७६४२९४

**प्रास्ताविक :**

नव्या आर्थिक धोरणाचा सर्वात महत्वाचा पैलू म्हणजे जागतिकीकरण अथवा वैश्वीकरण हा आहे नव्या उद्दिष्टाप्रत नेणारी मदत करणारी अशा स्वरुपाची ही रचना आहे. या दृष्टीनेच विविध बंधने कमी करणे किंवा याचा समावेश नव्या आर्थिक धोरणात केलेला आहे. मागील कांही वर्षात जागतिकीकरण विचारमंथन चालू आहे १९९४ मध्ये उरग्वे येथील फेरित राष्ट्राराष्ट्रातील व्यापार विषयक वाटाघाटी पूर्ण झाल्यानंतर १९९५ मध्ये जागतिक व्यापार संघटना ( W.T.O.) स्थापन झाली. या राष्ट्रामध्ये भारतही सामील असल्याने जागतिक मुक्त व्यापाराचे भारतीय शेती व रोजगार यावर काय परिणाम होतील याची चर्चा होणे स्वाभाविक होते.

**व्याख्या (Defination)**

जागतिकीकरण म्हणजे व्यापार, वित्त, रोजगार, कृषि, तंत्रज्ञान, दळणवळण, विदेशी स्थलांतर पर्यावरण, राहाणी, शासन समाजव्यवस्था, संस्कृती अशा सर्व क्षेत्रातून होत राहणारे रुपांतर होय असे म्हणता येईल. या संज्ञेत

१) वित्त व भांडवल यांची मालकी

२) बाजार व स्पर्धा

३) संशोधन व ज्ञान यांना संलग्न तंत्रज्ञान

४) एकंदर विश्वातील जाणीव

**संशोधन पध्दती :-**

संशोधन पध्दतीत प्राथमिक व द्वितीयक साधन सामुग्री या दोन पध्दतीचा समावेश होतो प्रस्तुत निबंध हा द्वितीय साधन सामुग्री यावर आधारित आहे.

**द्वितीयक साधन सामुग्री :-**

शोध निबंधामध्ये द्वितीय साधन सामुग्री च्या आधारे तक्ता विविध मासिके, शासकिय अहवाल,

जागतिक अहवाल व आकडेवारीच्या साहाय्याने मांडणी करण्याचा प्रयत्न केला आहे. भारतीय अर्थ व्यवस्थेत कृषि क्षेत्राचे महत्व भारताची अर्थ व्यवस्था कृषि प्रधान समजली जाते. नियोजन काळात बिगर शेती उद्योगाचे प्रमाण बरेच वाढून देशाच्या आर्थिक संरचनेत मोठे बदल झाले असले तरी शेतीचे स्थान महत्वपूर्ण राहीले आहे. देशाच्या आर्थिक विकासात कृषि क्षेत्राच्या योगदानाचे महत्व पूढील मुद्यांद्वारे स्पष्ट होते.

१) राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा

२) रोजगार पुरविणारे क्षेत्र

३) औद्योगीक विकासाला सहाय्यभूत

४) अन्नधान्याचा पुरवठा

५) आर्थिक स्थैर्य.

भारतीय शेतीचा विचार केला तर आपणास असे दिसून येते की, भारत हा कृषीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. विविध पंचवार्षिक योजनेच्या माध्यमातून कृषी क्षेत्राचा विकास करण्याचा प्रयत्न केला जात आहे. परंतु कृषि क्षेत्राची अवस्था पहाता एवढ्या मोठ्या लोकसंख्येला रोजी रोटी पुरविणा-या शेतीसाठी शासनाने पंचवार्षिक नियोजनाच्या माध्यमातून अपेक्षित खर्च केलेला नाही. त्यामुहे विज, पाणी, खते, पतपुरवठा, कृषी मालावर प्रक्रिया करण्यासाठी छोट्या मोठ्या कारखान्यांची उभारणी कृषीमंळाची विक्रीची व्यवस्था शितगृहे, गोदामे, गावागावातून पिकणारा भाजीपाला वगैरे नाशवंत वस्तुंची ने-आण करण्यास सार्वजनिक क्षेत्रात जी गुंतवणुक करण्याची गरज होती ती प्रत्येक पंचवार्षिक योजनेच्या काळात दुर्लक्षीत करण्यात आली.

**भारतीय कृषि अर्थव्यवथेची जागतिकीकरणाकडे वाटचाल**

१९९१ च्या आर्थिक सुधारणांनी भारतीय अवस्थेचा सांधा जागतीक अर्थकारणाशी घालून दिला. जागतिक बँक व आंतर राष्ट्रीय नाणे निधी यांच्याकडून कर्जरुपाने सहाय्य मिळविण्यासाठी आंतरराष्ट्रीय मुद्राकोष व जागतिक बँक यांनी लादलेल्या अटीमुळे भारतीय अर्थव्यवस्था जागतिकीकरणाकडे खेचली गेली. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेला खालील धोरणात्मक उपाय करावे लागले.

**गॅट कराराच्या जाचक तरतुदी :**

जागतिक व्यापार संघटनेच्या (W.T.O.) माध्यमातून १९९५ मध्ये डंकेल प्रस्तावामध्ये प्रथमच शेती आणि शेतीव्यापार यांचा समावेश केल्याने जागतिक व्यापार संघटनेच्या सभासद देशांनी सारखे जकात्तेतर निर्बंध आंतरराष्ट्रीय व्यापाराकडून काढुन टाकणे. शेतीमालाच्या किंमती ठरवितांना उत्पादन खर्च व इतर

अडथळे दूर करणे, शेतीमालाच्या निर्यातीला प्रत्यक्ष दिल्या जाणा-या अर्थसहाय्यात कपात करणे याचबरोबर बौध्दिक संपदा यासारखे अधिकार मान्य केले आहेत.

भारतात आर्थिक सुधारणा व डंकेल प्रस्ताव मान्य केल्याने प्रत्येक अर्थ संकल्पात शेती, जलसिंचन, ग्रामीण विकास आणि खतावरीत अनुदाने या सर्व बाबींवरील जी.डी.पी. च्या प्रमाणातील एकूण खर्चात (योजना अंतर्गत आणि योजना बाह्य )सातत्याने घट होत आहे. याकडे बारकाईने लक्ष दिले तर असे दिसून येते की, सन १९८९-९० वरुन १९९७-९८ च्या अंदाज पत्रकानुसार हे प्रमाण १.२९% एवढे की झाले.

**जागतिकीकरणाचा भारतीय कृषी क्षेत्रावरील प्रभाव :**

जागतिकीकरणाच्या देशाच्या जलद आर्थिक विकासाच्या दृष्टीने पाहिले तर करारात सहभागी झाल्यानंतर कराराचे समर्थक अर्थशास्त्रज्ञ व राजकीय नेते म्हण्तात जगातील देशांना भारतातील विविध नैसर्गिक साधनसामुग्री किफायतशीर दरात आकारल्यामुहे भारतातून शेती उत्पादनाची निर्यात वाढेल शेती मालाच्या आंतरराष्ट्रीय बाजारातील किंमती भारतीय बाजारातील किंमतीपेक्षा अधिक आहेत त्यामुळे भारतास परकीय चलन मिळेल. याचबरोबर जागतिक व्यापार संघटनेच्या करारानुसार या विकसित देशाना ते त्यांच्या शेतीला देत असलेल्या अनुदानामधील रक्कम कमी कमी होत जाणार व भारतीय शेतक-यांबरोबर च्या स्पर्धेत त्यांचा आज जो वरचष्मा आहे तो ही कमी होणार शिवाय प्रयोगशाहैतील संशोधनाऐवजी वेगवेगळ्या हवामानात टिकून राहणा-या वनस्पतीजन्य संशोधन वृत्तीला चालना मिळून शेती उत्पादनात वाढ होण्यास मदत होईल. असा अभास जागतीकीरणाच्या समर्थकाकडून निर्माण केला जात असतो परंतु वास्तव काय आहे, हे पाहिले तर आश्चर्य वाटल्या शिवाय राहणार नाही.

**जागतिकीकरणाचा कृषी रोजगारावर झालेला परिणाम :-**

जागतिकीकरणाच्या माध्यमातून नवतंत्र नववस्तू यांचा विकास होत राहून रोजगारात मोठ्या प्रमाणात वाढ होईल व भारतीय अर्थव्यवस्था सुधारुन भारतामधील आर्थिक व सामाजिक प्रश्नही सुटतील, अशा आशेने भारतीय नेत्यांनी १९९१ पासून बहुराष्ट्रीय कंपन्यांना आमंत्रित करीत आहेत. याचा प्रभाव शेती, औद्योगिक विज्ञान, शिक्षण व इरतही क्षेत्रावर होवु लागल्याने संघटीत व असंघटीत औद्योगिक योजनेतील लाखो लोकांचे रोजगार नष्ट होत आहेत. त्यास अनुसरुन असणा-या छोट्या छोट्या लघुउद्योग, कुटीरद्योगातील कोटावधी लोकांचे जीवन उद्धवस्त होत आहे. शासनाने वेगवेगळ्या पंचवार्षिक योजनेच्या माध्यमातून कृषी क्षेत्रात रोजगार निर्मिती वाढविण्यासाठी विविध कृषीधोरण राबविले ज्यामध्ये कृषी क्षेत्रात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण करणे, मुलभुत सुविधांचे व्यवस्थांचे सबलीकरण, निर्यातीसाठी कृषीक्षेत्रातील उत्पनाचा आढावा निर्माण करुन औद्योगिक क्षेत्राला प्राधान्य, बागाईत क्षेत्राला उत्तेजन

सिंचनाखालील क्षेत्रामधील जमीनीच्या अध: पतनाकडे लक्ष पुरविणे, जलसंधारण मृदसंधारणाच्या माध्यमातून रोजगार निर्मिती करणे रोजगार हमीद्वारा पुरेशा उत्पादक रोजगार निर्माण करणे इ. चा अंतर्भाव होतो.

भारतातील रोजगारांच्या स्थितींचा आढावा घेतल्यास असे दिसून येते की, रोजगार वाढीचा दर १९८३ ते १९९४ या काळात ०.९८ टक्के खाली आला या अनुषंगाने संघटीत क्षेत्रातील रोजगार कमी झाला असून रोजगार वाढीचा दर नकारात्मक (Negetive) आहे.

तक्ता क्रं.१.१ :
संघटीत क्षेत्रातील रोजगार वाढ (संख्या लाखामध्ये )

| वर्षे | सार्वजनिक क्षेत्र | खाजगी क्षेत्र | एकूण |
|---|---|---|---|
| १९७५-७६ | १३.६३ | ६.७९ | २०.४२ |
| १९९०-९१ | १९.०६ | ७.८६ | २६.७४ |
| १९९६-९७ | १९.५६ | ८.६९ | २८.२५ |
| २००३-०४ | १८.२० | ५.२५ | २६.४५ |

स्त्रोत : RBI HAND BOOK ON statistics on Indian Eco. 2005-06

**कृषी क्षेत्रातील रोजगार :-**

कृषी क्षेत्रातील रोजगाराने घसरता कल नोंदविला आहे.१९८३ -९३ या दरम्यान नेहमीच्या स्थितीत आधार रोजगारामध्ये १.५४% इतका वाढीचा दर नोंदविला गेला १९९३-९४ ते १९९८-९९ च्या दरम्यान हा वाढीचा दर नोंदविला गेला ऐंशीच्या दशकाच्या (५%) तुलनेत कृषी क्षेत्रातील प्रत्यक्ष वेतनात किंवा त्यांच्या वाढीचा दरातही कमी वाढ नोंदविली गेली (२.५% प्रतिवर्षी )

तक्ता क्रं.१.२
भारतातील कृषी क्षेत्राखाली रोजगार

| काळ | कृषी क्षेत्रातील रोजगारा वाढ टक्यामध्ये | |
|---|---|---|
| १९८३-१९९३-९४ | ग्रामीण | १.३८ |
| | शहरी | १.५४ |
| १९९३-९४ ते १९९९ | ग्रामीण | ०.१८ |
| | शहरी | ३.१४ |

कृषी क्षेत्रातील स्त्रियांच्या प्रासंगिक रोजगार वेतनात ८० च्या दशकात ३.०९% इतकी तर ९० च्या दशकात २.९३% इतकी वाढ झाली. या माहीतीवरुन स्पष्ट होते की, कृषी क्षेत्रात वाढ झालेली असली तरीही रोजगार संधीत वाढ झालेली नाही. जागतीकीकरणाची प्रक्रिया आणि रोजगाराचा आलेख यामध्ये

कांही संबंध आहे का याचा शोध घेणे आव्हानात्मक ठरते गेल्या दशकातील अनुभव पहाता असे म्हणता येईल की, कृषी क्षेत्रातील वाढीमुळे प्रासंगिक रोजगार निर्मितीवर जास्त भर आहे. आणि देशांतर्गत या प्रासंगिकतेचे कल हे काहीसे धाडीसी आहेत. भारतातील बेरोजगारीचे ग्रामीण भागातील बेरोजगारी आणि शहरी भागातील बेरोजगारी असे दोन प्रकारात वर्गीकरण केले जाते. देशाच्या एकुण लोकसंख्येपैकी ६८ ते ७०% लोकसंख्या ही ग्रामीण भागात राहते. शेती हे उपजीविकेचे साधन समजून शेतावर कार्य करतात. देशाच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नात शेतीक्षेत्राचे प्रमाण ३२ ते ३५ टक्के आहे. पूर्वी हे प्रमाण ४९% होते.

**भारतीय कृषी क्षेत्रातील बेकारीचे कारणे :**

१) भारतीय शेतीचे परंपरागत स्वरुप हे ग्रामीण बेरोजगारीला कारणीभुत आहे.

२) भारतीय शेतीचा अल्पविकास हा ग्रामीण बेरोजगारीला कारणीभुत आहे.

३) शेतीव्यवसायाचे काही प्रमाणात यांत्रीकीकरण केल्यामुळे शेती व्यवसायात बेरोजगारी आढळून येते.

४) भारतीय शेती हा व्यवसाय नसुन उपजीवीकेचे साधन आहे. असा परंपरागत दृष्टीकोन बाळगल्यामुळे ग्रामीण भागात बेरोजगारी निर्माण होते.

५) ग्रामीण भागात शेती व्यवसायाबरोबर प्रक्रिया व्यवसाय निर्माण करणे आवश्यक आहे शेतीवर आधारित व्यवसायाचा अपुरा विकास झाल्यामुळे ग्रामीण भागात बेरोजगारी आढळून येते.

६) शेती व्यवसायाशी संबंधीत भांडवलप्रधान तंत्राचा अवलंब केल्यामुळे बेरोजगारीची अवस्था कायम रहाते.

**कृषी व रोजगारावर होणारे परिणाम :**

१) जागतिकीकरणामुळे शेतीच्या समस्या कमी होण्याऐवजी अधिक तिव्र होत आहेत.

२) आपल्या देशात जो शेतीमाल मुबलक पिकतो तो शेतीमाल बाहेर देशातुन आयात होत आहे.

३) सिमांत शेतकरी, कामगार व त्यांचा कुटूंबाचा प्रश्न बिकट झाला आहे.

४) भारतीय शेती, शेतकरी, शेतमजुर संकटात सापडले आहेत.

५) शेतक-यांच्या आत्महत्येचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.

६) जागतिकीकरणामुळे शेतक-यांना मिळणारी सबसिडी कमी केली आहे.

**निष्कर्ष :-**

जागतिकीकरणाच्या स्पर्धेत भारतीय शेतकरी व रोजगार यावर काही प्रमाणात अनुकुल व यांना जागतिक बाजारपेठ उपलब्ध झाली. त्यामुळे नवीन तंत्रज्ञान, बि-बियाणे, औजारे, रोजगार निर्मिती, बाजारपेठेत स्पर्धा निर्माण झालेली दिसून येते तर दुसरीकडे जागतिकीकरणाचा फायदा हा विकसनशिल

देशापेक्षा विकसित देशांना जास्त झालेला दिसून येतो. त्यामुळे सिमांत शेतकरी व रोजगार यावर अनिष्ठ परिणाम झालेला दिसून येतो कारण भारतीय शेतकरी हा आर्थिक विवेंचनेत सापडून मोठ्या प्रमाणात आत्महत्या करीत आहे. तसेच सावकारी कचाटयात सापडल्यामुळे तो जुने कर्ज फेडण्यात बेजार असल्यामुळे शेतीत आत्याधुनिक तंत्राचा वापर करु शकत नसल्यामुळे यास्पर्धेत भारतीय सिमांत शेतक-यांचा टिकाव लागेल का? व त्याचा या ठिकाणच्या रोजगारावर काय परिणाम होईल हे दोन्ही प्रश्न अनुत्तरीतच राहातील असे वाटते.

**संदर्भ :**

१) जागतिकीकरण भारतासमोरी आव्हाने - प्रा. जगन कराड (प्र.आ. जाने.२००८)

२) कृषीधोरणाची भविष्यकालिन दिशा- डॉ. आर.एस.देशपांडे
(मराठवाडा अर्थशास्त्र परिषद, ५ व ६ फेब्रुवारी २००६.)

३) कृषी अर्थशास्त्र, डॉ. गंगाधार वि. कांयदे पाटील

४) जागतिकीकरणाच्या समस्या व अनुभव - शि.प.खेर, (प्रथम आवृत्ती १५ मार्च २००२.)

५) अर्थबोध खंड -१०, (अंक १ फेब्रुवारी २००५.)